Vol 1 Issue 12 June 2012

ISSN No :2231-5063

# International Multidisciplinary Research Journal

# *Golden Research Thoughts*

Chief Editor
Dr.Tukaram Narayan Shinde

Publisher
Mrs.Laxmi Ashok Yakkaldevi

Associate Editor
Dr.Rajani Dalvi

Honorary
Mr.Ashok Yakkaldevi

## Welcome to GRT

**RNI MAHMUL/2011/38595** **ISSN No.2231-5063**

Golden Research Thoughts Journal is a multidisciplinary research journal, published monthly in English, Hindi & Marathi Language. All research papers submitted to the journal will be double - blind peer reviewed referred by members of the editorial board.Readers will include investigator in universities, research institutes government and industry with research interest in the general subjects.


## *International Advisory Board*

Flávio de São Pedro Filho
Federal University of Rondonia, Brazil

Kamani Perera
Regional Center For Strategic Studies, Sri Lanka

Janaki Sinnasamy
Librarian, University of Malaya

Romona Mihaila
Spiru Haret University, Romania

Delia Serbescu
Spiru Haret University, Bucharest, Romania

Anurag Misra
DBS College, Kanpur

Titus PopPhD, Partium Christian University, Oradea,Romania

Mohammad Hailat
Dept. of Mathematical Sciences, University of South Carolina Aiken

Abdullah Sabbagh
Engineering Studies, Sydney

Ecaterina Patrascu
Spiru Haret University, Bucharest

Loredana Bosca
Spiru Haret University, Romania

Fabricio Moraes de Almeida
Federal University of Rondonia, Brazil

George - Calin SERITAN
Faculty of Philosophy and Socio-Political Sciences Al. I. Cuza University, Iasi

Hasan Baktir
English Language and Literature Department, Kayseri

Ghayoor Abbas Chotana
Dept of Chemistry, Lahore University of Management Sciences[PK]

Anna Maria Constantinovici
AL. I. Cuza University, Romania

Ilie Pintea,
Spiru Haret University, Romania

Xiaohua Yang
PhD, USA

......More

## *Editorial Board*

Pratap Vyamktrao Naikwade
ASP College Devrukh,Ratnagiri,MS India

R. R. Patil
Head Geology Department Solapur University,Solapur

Rama Bhosale
Prin. and Jt. Director Higher Education, Panvel

Salve R. N.
Department of Sociology, Shivaji University,Kolhapur

Govind P. Shinde
Bharati Vidyapeeth School of Distance Education Center, Navi Mumbai

Chakane Sanjay Dnyaneshwar
Arts, Science & Commerce College, Indapur, Pune

Awadhesh Kumar Shirotriya
Secretary,Play India Play,Meerut(U.P.)

Iresh Swami
Ex - VC. Solapur University, Solapur

N.S. Dhaygude
Ex. Prin. Dayanand College, Solapur

Narendra Kadu
Jt. Director Higher Education, Pune

K. M. Bhandarkar
Praful Patel College of Education, Gondia

Sonal Singh
Vikram University, Ujjain

G. P. Patankar
S. D. M. Degree College, Honavar, Karnataka

Maj. S. Bakhtiar Choudhary
Director,Hyderabad AP India.

S.Parvathi Devi
Ph.D.-University of Allahabad

Sonal Singh,
Vikram University, Ujjain

Rajendra Shendge
Director, B.C.U.D. Solapur University, Solapur

R. R. Yalikar
Director Managment Institute, Solapur

Umesh Rajderkar
Head Humanities & Social Science YCMOU,Nashik

S. R. Pandya
Head Education Dept. Mumbai University, Mumbai

Alka Darshan Shrivastava
Shaskiya Snatkottar Mahavidyalaya, Dhar

Rahul Shriram Sudke
Devi Ahilya Vishwavidyalaya, Indore

S.KANNAN
Annamalai University,TN

Satish Kumar Kalhotra
Maulana Azad National Urdu University


**Address:-Ashok Yakkaldevi 258/34, Raviwar Peth, Solapur - 413 005 Maharashtra, India**
**Cell : 9595 359 435, Ph No: 02172372010 Email: ayisrj@yahoo.in Website: www.aygrt.isrj.org**

ISSN No-2231-5063 Vol.1,Issue.XII/June 2012pp.1-4

Research Paper

# मराठी प्रायोगिक नाटकांचे स्वरूप आणि विचार

***संजय संभाजी लांडगे***
सहयोगी प्राध्यापक, अे.आर. बुर्ला कॉलेज,
सोलापूर,

***प्रास्ताविक :-***

महाराष्ट्रीय संस्कृतीमध्ये नाटकांना महत्वाचे स्थान आहे. मराठी माणूस हा नाट्यवेडा आहे. म्हणूनच गेल्या अनेक वर्षापासून चालत आलेली मराठी रंगभूमी समृद्ध आहे. नाटक हे दृश्य आणि श्राव्य व वाचनिय माध्यम आहे. मराठी नाटकांची सुरुवात इ.स. १८४३ साली विष्णूदास भावे यांच्या 'सीता स्वयंवर' या प्रयोगाने झाली असे सांगितले जाते. तर ज्योतिराव फुले यांनी इ.स. १८५५ ला लिहिलेले व पुस्तकरुपाने प्रकाशित झालले व प्रयोग रुपाने लोकांनसमोर आलेल्या 'तृतीयरत्न' या नाटकाने झाल्याचे सांगितले जाते. असे जरी असले तरी त्यांच्याही पूर्वी जवळपास शंभर वर्षे अगोदर मराठी नाटकाची परंपरा तंजावरकडील भोसले राजाच्या दरबारात चालत आलेली दिसते. लक्ष्मीनारायण कल्याण, 'कल्याण कल्पतरू' यासारखी अनेक नाटके तिकडे त्याकाळात मराठीतून सादर होत होती. आजही ती लिखित स्वरूपात आढळतात.

त्यानंतरच्या काळात महाराष्ट्रात मराठी नाटकांची सुरूवात झाली. म. ज्योतिराव फुले, विष्णूदास भावे यांच्यानंतर आणणासाहेब किर्लोस्कर, खाडीलकर, देवल या नाटककारांनी संगीत रंगभूमी गाजवली. त्यानंतर राम गणेश गडकरी, बाळ कोल्हटकर, वर्तक नाटककारांची नाटके गाजत होती. त्यानंतर पु.ल. देशपांडे, प्र.के. अत्रे यांच्या नाटकांनी संहितेत व प्रयोगात बदल घडवून आणले. तुझ आहे तुझपाशी, साष्टांग नमस्कार या नाटकांनी मन्वंतर घडवले. त्यानंतर वसंत कानेटकर, विजय तेंडुलकर, रत्नाकर मतकरी, वि.वा. शिरवाडकर अशा अनेक नाटककारांनी मराठी नाट्यसृष्टीला नवनवीन संहिता दिल्या, नवनवीन प्रयोगाची संजीवनीच त्यारूपाने मराठी रंगभूमीला लाभली होती.

***मराठी रंगभूमीवरील बदल :-***

इ.स. १९७५ नंतर मराठी नाटक आणि रंगभूमीवर अनेकानेक बदल झाले. नाटक नव्या रूपात येताना दिसू लागले. शोकांतिका, सुखात्मिका, मेलोड्रामा, फार्सिकल अशा विविध अंगाने ही नाटके येत होती. त्याच काळात सामाजिक सांस्कृतिक, औद्योगिक, शैक्षणिक जगतामध्ये बदल होत होते. त्याबदलाचे परिणाम म्हणून मराठी रंगभूमीही सजग बनत चालली होती. याच दरम्यान सामाजिक आत्मभान समाजाला देण्यासाठी कमी खर्चात व प्रभावीपणे मांडणी असणारे प्रायोगिक प्रयोग रंगभूमीवर सादर होऊ लागले होते. रंगभूमीवर अशी नवी संकल्पना नवे विषय, नवी मांडणी घेऊन प्रायोगिक नाटक अवतरले होते. या नाटकामधून व्यक्तीवाद, समुहवाद, समाजवाद, इहवाद, वर्गवाद, अस्तित्ववाद, वास्तववाद यांच्या प्रभावाच्या खुणा दिसतात.[१] तसेच त्यामधील काही नाटकांमधून त्या प्रबळरूपातून वावरताना दिसतात. प्रायोगिक नाटकांमधून नवा आशय समाजापुढे मांडण्यात आला. हा नवीन आशय सर्वसामान्य माणसाला सहजासहजी पटणारा नव्हता. कारण अशा प्रायोगिक नाटकात 'प्रयोग क्षमता' या मुल्याचा विचार आणि नाट्यघटकांविषयी विविध दृष्टीकोन लक्षात घेतले होते. प्रायोगिक नाटकांचा इतिहास, त्यामधील आशय, अभिव्यक्ती यांचा परस्परसंबंध आणि त्यांचा विचार स्पष्ट केला गेला. नव्या प्रयोगिकतेचा स्वीकार नाटक, आशय, विषय, तंत्र व प्रयोगशील नव्या वाटा शोधून नाटकाचे स्वरूप लक्षवेधी बदलले.

***मराठी प्रयोगिक नाटकाची पार्श्वभूमी :-***

१९६० नंतर समाज जीवनात खूप बदल झाले. औद्योगिकरण वाढती शहरे यंत्राची शक्ती अशा भौतिक सुविधांनी जीवनमुल्ये बदलून गेली. वृत्तपत्रे, नियतकालिके, आकाशवाणी, टेलिफोन अशा सुविधा तर विद्यापीठातून शिकलेली पिढी सुशिक्षित होऊन बाहेर पडत होती. शेक्सपिअर, मोलिअर अशा अनेक पाश्चिमात्य नाटककारांची नाटके वाचली जात होती. पाहिली जात होती या नवशिक्षितांना पाश्चिमात्य साहित्य व रंगभूमी चित्रपट यांची ओळख आता चांगली झाली होती. एकीकडे भारतीय रंगभूमीवरील संगीत नाटके, पौराणिक नाटके, ऐतिहासिक नाटके, सामाजिक नाटके यांनी भूरळ घातली होती. तर पाश्चिमात्य नाटकांनी नवनवे प्रयोग आशय विषयाच्यादृष्टीने करून नाट्यतंत्रज्ञान बदलून टाकले होते. त्यामुळे त्याचेही आकर्षण या नव्यापिढीला होते.[२] पौर्वात्य आणि पाश्चिमात्य अशा दोन्ही प्रवाहांना आपल्यात सामावून घेवून त्यांना स्वतःचा असा नाविन्यपूर्ण आविष्कार साधायचा होता असा आविष्कार साकार करीत असताना त्यांच्यावर पूर्वी झालेल्या किर्तन, व्याख्यान, प्रवचन अशा परंपरागत लोकसंस्काराचे पडसाद त्यामध्ये उमटत होते. त्यातूनच प्रायोगिक नाटकांची वाटचाल सुरू झाली. या काळात व्यावसायिकतेमध्ये केवळ मनोरंजन हा विषय होता. तर प्रायोगिक नाटकामध्ये जीवनाचा नवा आशय होता.

मराठी प्रायोगिक नाटकांवर पाश्चिमात्य रंगभूमीचाच प्रभाव असल्याचे दिसून येते. जागतिक रंगभूमीवर जी नाटके लक्षवेधी ठरली. ती आपल्याकडील रंगभूमीवर आणण्याचा प्रयत्न केला गेला. या नाटकांमध्ये रिपांदेल्लो, आयेनेस्की, आल्बी, कातू लार्ग, प्रिंटर इत्यादीचा समावेश आहे. श्री. वर्तक यांनी १ जुलै १९३३ रोजी मुंबईच्या रिपन थिएटरमध्ये 'आंधळ्याची शाळा' या नावाने बेंजोरसन यांचे 'गॉटलेट' या नाटकाचे मराठी रुपांतर नाट्य मन्वंतर संस्थेकडून सादर केले. वर्तकांनी त्यातील व्यक्तीरेखांच्या स्वाभाविक भावभावनांवर आपले लक्ष केंद्रित करून त्या आशयाची नाट्यरचना केली. वसंत कानेटकर यांचे 'वेड्याचे घर उन्हात' हे एक प्रभावी नाटक इ.. १८५७ च्या दरम्यानचे आहे.

कोणत्याही प्रायोगिक नाटकांच्या बाबतीत रसिक हा विषय, आशय, व्यक्तीरेखा आणि अभिव्यक्तीशी बोलत असतो. त्या जीवनानुभवातून मानवी मनातील गुंतागुंतीचे दर्शन घडविण्याचा प्रयत्न केलेला असतो. म्हणजेच नाटककाराने आपल्या नाट्यकृतीतून मानवी अभिव्यक्तीचे विश्लेषण केलेले असते.[३]

इ.स. १९८० नंतरच्या मराठी प्रायोगिक नाटकांमधून काळाच्या प्रवाहाबरोबर बदलणारा नाटकांचा आशय, नाटकातील अभिव्यक्ती व आशय आणि अभिव्यक्तीच्या परस्पर संबंधाचे विश्लेषण केले आहे.[४]

मराठी प्रायोगिक रंगभूमीवर अनेक नाटककारांची नाटके गाजली. त्यावर नाट्यसमीक्षक वर्तुळात भरपूर चर्चाही झाली आहे. विजय तेंडूलकर यांचे 'घाशीराम कोतवाल', सतीश आळेकर यांचे 'महानिर्वाण' रत्नाकर मतकरीचे लोककथा ७८ महेश एलकुंचवार यांचे 'वाडाचिरेबंदी' तर 'पुरुष' हे जयवंत दळवी यांचे नाटक गो. पु. देशपांडे यांचे 'अंधार यात्रा' अशा कितीतरी नाटकांची मोठी यादी आपणाला देता येईल ही सगळीच नाटके नव्या जाणिवा नवे विषय घेऊन आली होती. नाट्यतंत्र, नाट्यरचना, पात्र, संवाद, भाषा अशा सर्वच गोष्टींनी ही नाटके नवी होती. नव्या आत्मविश्वासाने नव्या प्रयोगासह या नाटकांनी प्रायोगिक रंगभूमी ढवळून काढली होती.

### *इतर भाषातील नाटकांचा प्रभाव :-*

प्रायोगिक रंगभूमी विविध अंगाने विकास पावत होती. मराठी बरोबरच हिन्दी, तेलुगू, कन्नड, गुजराती, बंगाली, उर्दू अशा कितीतरी भाषांमध्ये विविध विषयावरील नाटके सादर होत होती. आशय विषय आणि नाट्यतंत्राच्या बाबतीत या सर्व प्रयोगक्षम आणि नवीन संहिता होत्या. या विविध क्षेत्रातील नाटकामधून समाजातील ज्वलंतप्रश्न वास्तवपणे सादर होत होते. समाजात घडणाऱ्या घडामोडी घटना काही वेळेस जशाच्या तशाच रंगमंचावर सादर होताना दिसत होत्या. त्यामुळेही प्रायोगिक नाटकांकडे सर्वसामान्य रसिक प्रेक्षक ...... जात होता. त्यालाही आता प्रायोगिक नाटक आवडू लागले होते. 'पगला घोडा' 'गाना पंचरंगी तोतेका' 'बकरी' त्याच बरोबर नागमंण्डल, फूटपाथ अशी कितीतरी नाटके गाजत होती. याच काळामध्ये इतर भाषातील नाटके मराठीमध्ये लिहिली जात होती. ती मोठ्या संस्थाद्वारे रंगमंचावर सादर केली जात होती. बादल सरकार, गिरिश कर्नाड, श्री. रेड्डी, साहिल शेख असे कितीतरी नाटककार नव्या नव्या संहिता रंगभूमीवर गाजवित होते. त्यामुळे प्रायोगिक रंगभूमीला मोठा आधार मिळाला होता. प्रयोगशिलता, नाविन्यपूर्णता, रंगमंचावरील तांत्रिक बदल, घटना प्रसंगातील जिवंतपणा, संवाद कौशल्य, संगीताची परिणामकारकता अशा कितीतरी गोष्टीमुळे प्रायोगिक रंगभूमीला सोनेरी वैभव प्राप्त झाले होते. प्रायोगिक रंगभूमी झळाळून निघाली होती. नसरूद्दीन शाह, उत्पल दत्त, शबाना आझमी, ओमपूरी, स्मिता पाटील, सदाशिव अमरापूरकर, नाना पाटेकर असे कितीतरी दिग्गज कलावंत प्रायोगिक रंगभूमीने पुढे मराठी, हिन्दी, इंग्रजी आणि इतरही चित्रपटांना दिले आहे.

### *मराठी प्रायोगिक नाटक :-*

शेक्सपिरियन नाट्यतंत्राचा प्रभाव असतानाच दुसऱ्या बाजूला रंगभूमीवर इब्सेन नाट्यतंत्राचा जोर वाढत होता. इब्सेनच्या नाटकातून नवा आशय, नवीन तंत्र, विशिष्ट जीवनदृष्टी आणि नाट्यविषयक नवी जाणीव दिसून येते. त्यामुळे इब्सेन तंत्राचा प्रभाव रंगभूमीवर प्रकर्षाने जाणवू लागला होता. काहीतरी नाविन्यपूर्ण दाखवण्याची करण्याची जिद्द बाळगून त्याकाळातील कलावंत नाटककारांनी वेगवेगळ्या विषयावरील अनेक संहिता लिहिल्या आणि त्या प्रयोगरूपाने सादर झाल्या. त्यामुळे प्रायोगिक रंगभूमीच्या वैभवात मानाचा तूरा गोवला गेला.[५] 'क्रांती'-मधूकर तोरडमल, 'मित्राची गोष्ट'-विजय तेंडूलकर, 'कमला'-विजय तेंडूलकर, 'सावित्री' 'पुरुष'-बेगम बर्वे, 'मुक्ता' 'कालचक्र'-जयवंत दळवी, 'महापूर' 'महानिर्वाण'-सतीश आळेकर, 'वाडा चिरेबंदी'-महेश एलकुंचवार, 'आम्ही देशाचे मारेकरी'-टेक्सास गायकवाड, 'घाशिराम कोतवाल'-विजय तेंडूलकर अशा कितीतरी नाटकांनी आणि नाटककारांनी मराठी प्रायोगिक रंगभूमी दणाणून सोडली होती. ही सगळी प्रायोगिक नाटके केवळ नवनाट्यतंत्र नव आशय विषय आणि सादरीकरण यांनी नटलेली होती. समाजातील जिवंत प्रश्न अत्यंत पोटतिकडीने आणि तळमळीने या नाटकातून मांडले गेले. त्यामुळे अशी नाटके म्हणजे समाजाचा आरसाच होय. समाजाला त्यांचेच प्रश्न सांगून वाईट गोष्टीपासून परावृत्त करून चांगला माणूस घडविण्याचे काम प्रायोगिक नाटकाद्वारे होत होते. ही अत्यंत महत्वपूर्ण गोष्ट आहे. म्हणूनच या काळातील प्रायोगिक रंगभूमीची उभारी अधिक बळकट आणि दणकट होत गेलेली दिसून येते. इब्सेन नाट्यतंत्र, शेक्सपिरियन नाट्यतंत्र, संस्कृतनाट्य तंत्र अशा विविध तंत्राचा अविष्कार या नाटकांमधून झाला आहे. तसेच लोककलांचा वापर करून किंवा लोकसाहित्याचा वापर करून या काळामध्ये वरील नाटककारांनी मराठी प्रायोगिक रंगभूमी अधिक समृद्ध केली आहे.

### *१९८० नंतरच्या काळातील काही महत्वाची नाटके :-*

या काळामध्ये नाट्यसृष्टीमध्ये बरेच बदल झालेले दिसून येतात. पौराणिक, ऐतिहासिक, सामाजिक, मनोविश्लेषणात्मक, शोकांतिक, सुखात्मिक, फार्सिकल असे सर्व प्रकारचे लेखन होवू लागले होते. वसंत कानेटकर, विजय तेंडूलकर, जयवंत दळवी, वि.वा. शिरवाडकर, सतीश आळेकर, शाम मनोहर, मधुकर तोरडमल, गो.पु. देशपांडे, महेश एलकुंचवार, अच्युत वझे यासारखे महत्वाचे नाटककार या काळामध्ये लिहिताना दिसून येतात. विविध विषय, आशय, मांडणी, नाट्यतंत्र, बहुरंगी प्रकाश योजना, नेपथ्य, प्रभावी संगीत अशा नाविन्यपूर्ण व प्रयोगशील तंत्राचा वापर बिनधास्तपणे रंगमंचावर आणण्याचे धाडस या काळातील पिढीने केले त्यामुळेच प्रायोगिक रंगभूमी समृद्ध झाली.

मध्यमवर्गीय रसिकांची आवडनिवड, नाटकांची पसंती, प्रयोगशीलतेचा प्रभाव याचा परिणाम रंगभूमीवर होत होता. चित्रपटांची चलती, व्यवसाय अभिमुखता नाविव्यपूर्ण तंत्रप्रभावी कथा साऱ्याच गोष्टीमुळे मराठी नाटक आणि रंगभूमीवर उदासिनता पसरली होती. परंतु ही उदासिनता दूर करण्यासाठीच नव्या कथा, आशय नवेतंत्रज्ञान, नवे कलावंत यांची गरज होती. ती प्रायोगिक रंगभूमीच्या अंगाने पूर्ण झालेली दिसून येते. मराठी रंगभूमीवर या काळात सरकते आणि फिरते रंगमंच. माणसाला आश्चर्यचकीत करून सोडणारी दृश्ये, वेगवेगळी परंतु प्रभावी प्रकाश योजना रंगमंचावर साकारू लागली. प्रकाश योजनेद्वारे प्रत्यक्ष रंगमंचावर रेल्वे, विमान, कार किंवा स्मशान, चिता, पाऊस, विजांचा चमचमाट अशा कितीतरी गोष्टी साकार होऊ लागल्या होत्या. लोकांना त्या आकर्षित करून सोडत होत्या. अशा प्रभावी तंत्रज्ञानाचा वापर रंगमंचावर होऊ लागला होता. त्यामुळे मराठी नाटकाची संपूर्ण रचनाच बदलून गेली. आधी घडून गेलेल्या घटना प्रसंगाचे दृश्य नाटकातून दाखवता येऊ लागले. ही 'फ्लॅशबॅक सीन' पद्धत चित्रपटातून नाटकात आल्याचे दिसून येते. असे कितीतरी बदल परिवर्तन स्विकारीत आणि रूढ नाट्यपरंपरांना बाजूला सारीत प्रायोगिक नाटक पुढे आले. स्वतःचा एक मार्ग त्यांनी तयार केला. मराठी नाट्यसृष्टीमध्ये स्वतःचे अस्तित्व सिद्ध करून स्वतःची एक वाट तयार केली. त्यामुळे या काळात प्रायोगिक नाटकांचे वैभव संपन्न आणि श्रीमंत बनले होते. त्यामध्ये अनेक नाटककार, तंत्रज्ञ, दिग्दर्शक आणि रसिक या साऱ्यांचाच महत्वपूर्ण वाटा होता हे मान्यच करावे लागते.[६]

बदलती जीवनमुल्ये, कौटुंबिक आणि सामुहिक नाती, संदर्भमुल्ये, मानवीमुल्ये, सामाजिक नितीमुल्ये, प्रगती, विकास आणि विज्ञानाने लावलेले नानाविध शोध यामुळे मानवी जीवन बदलून गेले. त्यामध्ये असणारा फोलपणा माणसाला समजू लागला. सगळ्याच गोष्टीकडे बघण्याची माणसाची दृष्टी बदलून गेली. या घटनांचे पडसाद इतरही सगळ्याच साहित्यातून उमटू लागले. नाटक हे समूह मनाशी संबंधित असल्याने त्यावर या सर्वच गोष्टीचा परिणाम झाला. याचेच फलित म्हणून या पिढीतील लेखकांनी लेखन विषयक असणाऱ्या रूढ संकेतांना मुठमाती दिली व नव्या गोष्टीचे स्वागत केले. या काळात नाट्यमन्वंतर, रंगायतन, नाट्यसंपदा, अशा विविध संस्थाचे कार्य बहुमौलिक होते. विजय तेंडूलकर, सतीश आळेकर, महेश एककुंचवार, रत्नाकर मतकरी, टेक्सास गायकवाड, प्रेमानंद गज्वी, दत्ता भगत, गो. पु. देशपांडे, अच्युत वझे अशा अनेक नाटककारांनी आपली कल्पकता आणि कौशल्यपणाला लावून नव्या नव्या संहिता लिहिल्या. नव्या नाटकांनी मराठी प्रायोगिक रंगभूमी बहरून गेली होती. त्यामध्ये घाशिराम कोतवाल, महानिर्वाण, उध्वस्त धर्मशाळा, बेगम बर्वे, जुलूस घोडा, चल रे भोपळ्या टुणूक टुणूक, अंधारयात्रा, वाडा चिरेबंदी, आम्ही देशाचे मारेकरी, विठो रुखमाय, अशा कितीतरी नाटकांचा महत्वपूर्ण वाटा आहे. या नाटकांमधून विडंबन, उपहास, संहितेमधील नवसंवेदनशीलता, कल्पक दिग्दर्शन मुक्त शैली, बीनकमानी प्रयोग, आधुनिक तंत्रज्ञान, प्रतिकांचा परिणामकारक वापर, प्रभावी पात्र योजना, परिणामकारक प्रकाश योजना, रंगमंचाचा कल्पक वापर, जबरदस्त संहिता लोककलेचा प्रभावी वापर, गीत संगीतचा सूचक वापर अशा विविध तंत्राने आणि वैशिष्ट्यांनी ही मराठी प्रायोगिक रंगभूमी नटली होती. नव्या प्रभावी आणि परिणामकारक नाट्यसंहितामुळे प्रायोगिक रंगभूमी सशक्त आणि तारुण्याने नटलेली शक्तीशाली तेजस्वी रणरागिणी बनली होती असेच म्हणावे लागेल.

### *समारोप :-*

प्रायोगिक नाटक म्हणजे समाज मनाचा आरसा आहे. सामाजिक समस्या, सामाजिक परिवर्तन, बदलती अभिरूची याचा वेध या नाटकातून घेतला गेला आहे. अभिनय, नाट्यतंत्र, संगीत, प्रकाश योजना, गीत, संवाद, आशय, विषयातील परिवर्तन यामुळे प्रायोगिक नाटकांना उंची गाठता आली. मध्यमवर्गीयांच्या कौटुंबिक समस्या, ताण-तणाव अहंकार, स्वार्थीवृत्ती, गृहकलह, अंतरजातीय प्रेमविवाह, राजकारण यामुळे होणारा संघर्ष प्रायोगिक नाटकातून दिसून येतो. याच काळात बहुसंख्य प्रायोगिक नाटकामधून मानवी जीवनमुल्यांची समस्या चित्रित झाली आहे. सत्य प्रामाणिकपणा यांची पायमल्ली त्याच बरोबर बलात्कार समाज निषिद्ध शरीरसंबंध या कृती मुल्याचा नाश करतात. वासनाकृती व मनोविकृती या समस्येचा अविष्कार करणारी प्रायोगिक नाटके याच काळात लिहिली गेली आहेत. ज्यामुळे या काळात नवनवीन प्रयोगक्षम संहितांचे

सादरीकरणातील नाविन्यपूर्ण प्रयोगांना गती मिळाली होती. विविध संस्थांनी या काळात कृतीशील, परिवर्तनशील आणि वेगवेगळे प्रयोग करून मराठी रंगभूमीला राजवैभव प्राप्त करून दिले. अभिनव कल्पकता नवाभिनेष प्रतिभाशक्ती, नाट्यतंत्रातील आधुनिक बदल, भावनाशिलतेचा वापर, समर्थ अभिनय या सर्वच अंगाने या नाटकातील व्यक्तिरेखाच नव्हे तर संपूर्ण नाटकच रंगभूमीवर झळाळून निघाले होते.

***संदर्भसूची :-***

१) देशपांडे वि.भा. मराठी नाटक, स्वातंत्र्योत्तर काळ १९४७-९० व्हिनस प्रकाशन, पुणे, प्रथम आवृत्ती १९९२, पृ. ४६.
२)सावंत कृ.रा. पाश्चात्य रंगभूमीची वाटचाल, मॅजेस्टिक प्रकाशन, आवृत्ती १ ली, १९९६, पृ. १४.
३)देशमुख अनंत, आधुनिक नाट्यविचार, पुष्प प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती १९९३,पृ. ९
४)देशमुख अनंत, आधुनिक नाट्यविचार, पुष्प प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती १९९३,पृ. ५८.
५)भवाळकर तारा, मराठी नाटक, नवी दिशा नवी वळणे, मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे प्रथमावृत्ती १९९७, पृ. ७२.
६)देशपांडे वि.भा., मराठी नाटक स्वातंत्र्योत्तर काळ १९४७-९०, व्हिनस प्रकाशन मंदिर, पुणे, प्रथमावृत्ती १९९२, पृ. ८६.

# Publish Research Article
# International Level Multidisciplinary Research Journal For All Subjects

Dear Sir/Mam,

We invite unpublished Research Paper,Summary of Research Project,Theses,Books and Book Review for publication,you will be pleased to know that our journals are

## Associated and Indexed,India

- International Scientific Journal Consortium
- OPEN J-GATE

## Associated and Indexed,USA

- EBSCO
- Index Copernicus
- Publication Index
- Academic Journal Database
- Contemporary Research Index
- Academic Paper Databse
- Digital Journals Database
- Current Index to Scholarly Journals
- Elite Scientific Journal Archive
- Directory Of Academic Resources
- Scholar Journal Index
- Recent Science Index
- Scientific Resources Database
- Directory Of Research Journal Indexing

Golden Research Thoughts
258/34 Raviwar Peth Solapur-413005,Maharashtra
Contact-9595359435
E-Mail-ayisrj@yahoo.in/ayisrj2011@gmail.com
Website : www.aygrt.isrj.org